चौफेर महाराष्ट्र
पुन्हा पेटणार क्रांतीची मशाल....
Website : www.chofermaharshtranews.com DIGITAL NEWS Email Id : chaufermaharashtranews@gmail.com

बातमीसाठी संपर्क
श्री. मंगेश मारुतीराव सोनटक्के
संपादक
9272126032

# स्वामी विवेकानंद विद्यालय येथे सायबर सुरक्षा जागरूकता अभियान कार्यक्रम संपन्न

**अकोट । प्रतिनिधी :**

येथील स्वामी विवेकानंद विद्यालय येथे क्विक हिल फाऊनडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगदीश साबु आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी शंकरलाल खंडेलवाल विद्यालयातील विद्यार्थी सुमित संजय सपकाळ व अनिकेत भूडके या मुलांनी मार्गदर्शन केले. यावेळी साइबर सुरक्षा जागरूकता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते .

या अभियानामध्ये विद्यार्थ्यांना इंटरनेटवरील धोके, सुरक्षितता उपाययोजना आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. वाढती गुन्हेगारी लक्षात घेता व वाढता सोशल मीडियाचा वापलक्षात घेता आपण ऑनलाइन फसवणुकीला बळी पडत आहोत . तसेच आपण सोशल मीडियावर आपले जे वैयक्तिक फोटो माहिती शेअर करतो तिचा सुद्धा गैरवापर होताना मोठ्या प्रमाणात दिसत आहे.त्यासोबतच ऑनलाइन फ्रॉड कॉल बँक मधून ऑटोमॅटिक गायब होणारी रक्कम कशाप्रकारे फ्रौड करून काढल्या जाते. तसेच विद्यार्थी लहान वयापासून मोबाईल मुळे वेडी झालेली आहेत एक प्रकारचं महाभयंकर लागलेला मोबाईलचा व्यसन सोडवण्यासाठी अकोट येथील स्वामी विवेकानंद विद्यालय येथे सायबर क्राईम बाबत मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापिका जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, आजच्या डिजिटल युगात इंटरनेटचा वापर अपरिहार्य झाला आहे, पण त्याचबरोबर त्यातील धोके ओळखून सुरक्षितता पाळणे अत्यंत आवश्यक आहे.कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध सत्रांद्वारे इंटरनेट सुरक्षितता, सोशल मीडिया सुरक्षितता. पासवर्ड सुरक्षितता, फिशिंग आणि स्कॅम्स अशी माहिती देण्यात आली.विद्यार्थ्यांना साइबर सुरक्षा तज्ञांच्या मार्गदर्शनात विविध प्रात्यक्षिके देखील दाखविण्यात आली.

यामुळे विद्यार्थ्यांनी साइबर सुरक्षा उपाययोजनांचे महत्त्व ओळखले आणि त्यांना प्रत्यक्षात कसे अमलात आणावे हे शिकले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी सांगितले की, आम्ही या प्रकारच्या अभियानांद्वारे विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि जबाबदार इंटरनेट वापरकर्ता बनविण्याचा प्रयत्नकरतो.विद्यार्थ्यांनीही या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आम्हाला इंटरनेटचा योग्य आणि सुरक्षित वापर करण्याबद्दल या कार्य शाळेमधून खूप काही शिकायला मिळाले, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.यावेळी शाळेचे शिक्षक धांडे, चव्हाण व शिक्षकत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

